N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** अहमदनगर **P.S.(ठाणे):** श्रीरामपूर शहर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0611 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 12/06/2024 23:48

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 12/06/2024

**Date To ( दिनांक पर्यंत):** 12/06/2024

**Time From (वेळेपासून):** 11:00 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 14:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 12/06/2024 **Time (वेळ):** 23:25 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 039

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 12/06/2024 23:25 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 3 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** श्रीरामपूर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** भागिरथ लक्ष्मण पवार

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1969

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | शिरसगाव, ताश्रीरामपुर,श्रीरामपूर शहर,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | शिरसगाव, ताश्रीरामपुर,श्रीरामपूर शहर,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीमती संगीता नंदलाल पवार | | | 1. दत्त नगर पोटिळकनगर, ताश्रीराम,श्रीरामपूर शहर, अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
| --- | --- |

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद

श्रीरामपूर ,जि.अहमदनगर
दिं. 12/06/2024

मी,भागिरथ लक्ष्मण पवार, वय 55 वर्षे, धंदा-सेवानिवृत्त, रा. शिरसगाव, ता.श्रीरामपुर, जि.अहमदनगर, मो.नं. 7972805992..

समक्ष हजर राहुन फिर्याद लिहुन देतो की, मी वरील ठिकाणी कुटुंबासह राहण्यास असुन सध्या सेवानिवृत्त आहे. मी दिनांक 11/06/2024 रोजी पोलीस उपअधीक्षक श्री. लोखंडे यांना फोन करुन माझी पत्नी नामे श्रीमती सुनंदा बारकु शेळके ही सन 2003 पासुन सौ. सुभद्राबाई बाबुराव गायकवाड प्राथमिक षाळा, वार्ड नंबर 1,श्रीरामपुर येथे उप शिक्षक म्हणुन कार्यरत आहेत. तिच्या वरिष्ठ वेतनश्रेणीचे फरकाचे बील जमा केल्याच्या मोबदल्यात, सदर शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती पवार मॅडम 50,000/-रुपये लाच मागणी करत असले बाबत तक्रार सांगीतली होती. त्यानुसार मला पोलीस उपअधीक्षक श्री. लोखंडे यांनी दिनांक 12/06/2024 रोजी सकाळी 10.00 वाजता श्रीरामपूर येथे सुरक्षीत ठिकाणी हजर राहण्याची सुचना दिली होती.

श्री.लोखंडे यांचे सुचनेप्रमाणे मी दिनांक 11/06/2024 रोजी सकाळी 10.00 वाजता श्रीरामपूर येथे सुरक्षीत ठिकाणी हजर असतांना त्या ठिकाणी एक चारचाकी वाहन येवुन उभे राहिले, त्यावेळी मी त्या वाहनाजवळ गेलो असता मला पोलीस उपअधीक्षक श्री. लोखंडे यांनी माझा परिचय विचारला त्यावेळी मी माझे नाव सांगीतले, त्यानंतर त्यांनी त्यांचा व त्यांचे सोबतचे पंच व सापळा पथकाचा माझ्याशी परिचय करुन दिला. त्यानंतर मला श्री. लोखंडे यांनी वाहनात बसण्यास सांगीतले,त्यानुसार मी त्यांचे वाहनात बसलो. त्यानंतर श्री. लोखंडे यांनी मला तक्रार विचारली मी पंचासमक्ष लाच मागणी होत असलेबाबत तक्रार सांगीतली, त्यावर मला श्री.लोखंडे यांनी सदर तक्रार माझ्या हस्ताक्षरात लिहुन देण्यास सांगीतली असता, मी माझी पत्नी नामे श्रीमती सुनंदा बारकु शेळके ही सन 2003 पासुन सौ. सुभद्राबाई बाबुराव गायकवाड प्राथमिक शाळा, वार्ड नंबर 1,श्रीरामपुर येथे उप शिक्षक म्हणुन कार्यरत आहेत. माझ्या पत्नीचा दि.01/06/2015 रोजी ते दि. 30/09/2022 रोजी पावेतोचा वरिष्ठ वेतन श्रेणीचा फरक तिच्या खात्यात जमा केला म्हणुन तिच्या शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती पवार मॅडम, हया 50,000/- रुपये लाच मागणी करत असल्याची सविस्तर तक्रार लिहुन दिली. त्या तक्रारीवर मी, दोन्ही पंचांनी व श्री. लोखंडे यांनी सही केली.

त्यानंतर माझ्या तक्रारीवरुन श्रीमती पवार हया माझ्या वरील कामासाठी माझ्याकडे लाच मागणी करतात अगर कसे? याबाबत पडताळणी करण्याचे ठरले, त्यानंतर श्री. लोखंडे यांनी पडताळणी कारवाईमध्ये व्हॉईस रेकॉर्डर वापरण्यात येणार असल्याचे सांगुन त्याबाबत मला, व पंचांना माहिती दिली, तसेच पडताळणी कारवाई बाबत सुचना दिल्या. त्यानंतर श्री. लोखंडे यांच्या सुचनेप्रमाणे पोकॉ कराड यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझे,, दोन्ही पंचांचे तसेच श्री.लोखंडे यांचे उपस्थिती बाबत निवेदन रेकॉर्ड करण्यात आले. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझ्या ताब्यात दिले व श्रीमती पवार यांची भेट घेण्यासाठी मला व पंच क्र.1 अशांना 11.00 वाजेचे सुमारास माझ्या दुचाकी वाहनाने रवाना केले. त्यानुसार आंम्ही सौ. सुभद्राबाई बाबुराव गायकवाड प्राथमिक शाळा, वार्ड नंबर 1,श्रीरामपुर येथे गेलो असता श्रीमती पवार हया त्यांच्या कक्षात बसलेल्या होत्या.,मी व पंच असे त्यांचे कक्षात गेलो,त्यावेळी मी त्यांचेशी माझ्या पत्नीच्या वरिष्ठ वेतन श्रेणीच्या वेतनाच्या फरकाबाबत चर्चा केली, त्या चर्चे दरम्यान श्रीमती पवार यांनी पंचासमक्ष माझ्याकडे 50,000/-रुपये लाचेची मागणी केली, त्यावेळी मी त्यांना काही कमी जास्त करा असे म्हणालो असता श्रीमती पवार म्हणाल्या, पाच कमी दया, असे म्हणुन त्यांनी माझ्याकडे 45000/-रुपये लाच मागणी केली,त्यावेळी मी पैसे सोबत आणले नाही, मी पैसे घेवुन येतो असे म्हणालो,त्यावेळी श्रीमती पवार म्हणाल्या,कार्यालय जर बंद असेल तर मला फोन करा,

त्यावर मी ठीक आहे असे म्हणुन मी व पंच क्र.1 असे सापळा पथक थांबले त्या ठिकाणी परत आलो. त्यावेळी पोकॉ कराड यांनी माझ्या ताब्यातील व्हॉईस रेकॉर्डर काढुन घेतले व ते बंद केले.त्यानंतर मी व पंच क्र 1 यांनी वरील प्रमाणे घडलेली हकिकत श्री. लोखंडे यांना सांगीतली. तसेच श्री.लोखंडे यांनी पंचांसमक्ष व्हॉईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले, यावरुन श्रीमती पवार यांनी माझ्याकडे माझे पत्नीचे वरिष्ठ वेतनश्रेणीच्या फरकांची रक्कम माझ्या पत्नीच्या बँक खात्यात जमा केल्याच्या मोबदल्यात बक्षीस म्हणुन माझेकडे 45,000/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर सौ. सुभद्राबाई बाबुराव गायकवाड प्राथमिक शाळा, वार्ड नंबर 1,श्रीरामपुर येथे श्रीमती पवार यांचेवर सापळा आयोजीत करण्याचे ठरले. त्यानंतर श्री.लोखंडे यांनी सापळा कारवाईमध्ये ॲन्थ्रासीन पावडर व अल्ट्राव्हायलेट दिवा वापरण्यात येणार असुन त्याबाबत मला व पंचांना उजेडात व अंधारात प्रात्यक्षीक करुन दाखविण्यात आले. त्यानंतर श्री.लोखंडे यांचे सुचनेवरुन मी लाच रक्कम 45000/- रुपये माझ्या बचतीतुन हजर केली. त्यात 500 रुपये दराच्या 90 भारतीय चलनी नोटा मी हजर केल्या, त्यानंतर सदर नोटांचे नंबर लिहुन घेण्यात आले व संदर नोटांवर ॲन्थ्रासीन पावडर लावण्यात आली व सदर लाच रक्कम माझ्या पँटच्या उजव्या खिशात ठेवली. त्यानंतर मला व पंचाला सापळा कारवाई बाबत श्री.लोखंडे यांनी सुचना दिल्या व लाच रक्कम स्वीकारल्यानंतर करावयाचा नियोजीत इशारा मला सांगीतला,त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझ्याकडे दिला, त्यानंतर मला व पंच क्र. 1 अशांना सौ. सुभद्राबाई बाबुराव गायकवाड प्राथमिक शाळा, वार्ड नंबर 1,श्रीरामपुर येथे श्रीमती पवार यांची भेट घेवुन त्यांनी मागणी केलेली 45000/- रुपये लाच रक्कम देण्यासाठी माझ्या दुचाकी वाहनाने रवाना केले. आमचे मागोमाग सापळा पथक आले. आम्ही सौ. सुभद्राबाई बाबुराव गायकवाड प्राथमिक शाळा, वार्ड नंबर 1,श्रीरामपुर येथे गेल्यावर आम्हाला शाळेचे कार्यालय बंद असल्याचे दिसले, त्यावेळी मी श्रीमती पवार यांना माझ्या वरील मोबाईल क्रमांकावरुन श्रीमती पवार यांचा मोबाईल क्र. 9511272197 या क्रमांकावर फोन केला असता, श्रीमती पवार यांनी मला त्यांचे शाळेचे बाजुला असलेल्या मुलींचे वसतीगृह, येथे बोलाविले, त्यानुसार मी सापळा पथकास आमचे मागे येण्याचा इशारा करुन मी व पंच क्र.1 असे मुलींच्या वसतीगृहाकडे गेलो, आम्ही वसतीगृहाच्या गेटजवळ जाउन थांबलो, सापळा पथक देखील आमचे मागोमाग वसतीगृहाजवळ येउन थांबले, थोडयाच वेळात वसतीगृहाच्या गेटजवळ श्रीमती पवार हया त्यांच्याकडील दुचाकी वाहनाने आल्या, त्यानंतर मी पंच क्र. 1 व श्रीमती पवार असे त्यांच्या वसतीगृहाच्या अधीक्षक कार्यालयात गेलो, त्याठिकाणी मी माझ्या पँटच्या उजव्या खिश्यातुन लाच रक्कम काढुन त्यांचे समोर धरली वरिष्ठ वेतनश्रेणीचे हे 45000/-रुपये असे म्हणुन मोजुन घ्या, असे म्हणालो असता श्रीमती पवार म्हणाल्या, मोजण्याची आवश्यकता नाही, कमी असतील तर तुम्हाला फोन करील असे म्हणुन त्यांनी माझ्याकडुन पंचा समक्ष 45000/-रुपये लाच रक्कम स्वीकारली व ती रक्कम त्यांनी त्यांचे हातात ठेवली.

त्यानंतर मी माझा डावा हात डोक्यावर फिरवुन सापळा पथकास लाच स्वीकारल्याचा नियोजीत इशारा केला, त्यानंतर सापळा पथक त्याठिकाणी आले, त्यावेळी पोकॉ कराड यांनी माझ्या ताब्यातील व्हॉईस रेकॉर्डर त्यांचे ताब्यात घेवुन तो बंद केला, त्यावेळी मी श्री. लोखंडे यांना सांगीतले की, हया श्रीमती पवार आहे, हयांनी माझ्याकडुन 45000/- लाच रक्कम स्विकारुन त्यांनी त्यांचे हातात धरलेली आहे. मी असे सांगीतल्या नंतर श्री. लोखंडे यांनी त्यांचे सोबतच्या महिला कर्मचारी श्रीमती शिंदे यांच्या मदतीने श्रीमती पवार यांना ताब्यात घेतले व त्यांच्या हातातील लाच रक्कम ताब्यात घेतली, त्यांनतर त्या नोटांचे नंबर सापळा कारवाई पुर्वी लिहुन घेण्यात आलेल्या नोटांच्या नंबरशी पडताळुन पाहीले असता, ते तंतोतंत जुळल्याची खात्री झाली.त्यानंतर श्री.लोखंडे यांनी श्रीमती पवार यांना त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्रीमती संगीता नंदलाल पवार वय-53 वर्षे , व्यवसाय- नोकरी मुख्याध्यापिका, सौ. सुभद्राबाई बाबुराव गायकवाड प्राथमिक शाळा, वार्ड नंबर 1,श्रीरामपुर रा. दत्तनगर पो.टिळकनगर,ता.श्रीरामपूर जि.अहमदनगर असे सांगीतले. त्यानंतर वसतीगृहाच्या अधीक्षक कार्यालयाच्या बाजुच्या खोलीमध्ये सापळा कारवाई बाबत श्रीमती पवार यांच्या हाताची व लाच रकमेची तपासणी करण्यात आली व फोटो काढले. त्यानंतर मला श्री.लोखंडे यांनी शासकीय विश्रामगृह श्रीरामपूर येथे येण्यास सांगीतले व श्रीमती पवार यांना ताब्यात घेवुन शासकीय विश्रामगृह श्रीरामपूर येथे आले,मी पण श्री.लोखंडे यांचे सुचनेप्रमाणे तेथे हजर झालो. त्याठिकाणी सापळा पथकाने पंचनाम्याचे पुढील कामकाज केले.

तरी दिनांक 12/06/2024 रोजी 11/00 वा ते 14/00 वा. सुमारास लाच मागणी पडताळणी कारवाई व सापळा कारवाई दरम्यान श्रीमती संगीता नंदलाल पवार वय-53 वर्षे , व्यवसाय नोकरी, मुख्याध्यापिका, सौ. सुभद्राबाई बाबुराव गायकवाड प्राथमिक शाळा, वार्ड नंबर 1,श्रीरामपुर रा.दत्त नगर पो.टिळकनगर,ता.श्रीरामपूर जि.अहमदनगर यांनी माझी पत्नी नामे श्रीमती सुनंदा बारकु शेळके हिच्या वरिष्ठ वेतनश्रेणीच्या फरकाची रक्कम 1,62,366/- रुपये माझ्या पत्नीच्या बँक खात्यात जमा केल्याच्या मोबदल्यात माझ्याकडे पंचासमक्ष 50,000/- रुपये लाचेची

[illegible] करुन, [illegible] 45000/- रुपये लाच मागणी करुन ती लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारली म्हणुन माझी त्यांच्या विरुध्द फिर्याद आहे

समक्ष हे लिहुन दिले

13. **Action taken:** Since the above information reveals commission of **offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरुन अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

NITIN BHASKARAO DESHMUKH(I (Inspector)) / PBMH76693

or (किंवा)

(2) **Directed** (Name of I.O.) (तपास अधिकाऱ्याचे नाव):

Rank (पद):

No.(क्र.):

to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)

(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):

on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणाऱ्याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अमलदार
[illegible]पूर शहर पो.स्टे

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** NITIN BHASKARAO D

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):** PBMH76693

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र). **Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | महिला | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(**जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.**)**